मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जनसेवेचा वारसा अन् विकासाचे ध्येय भोसरी प्रभाग पाच मधील नेतृत्व सागर बाळासाहेब गवळी

## विकसनशील प्रभाग : 05

**पिंपरी : राजकारणात सामाजिक भान आणि विकासाची दूरदृष्टी जपणारे नेतृत्व म्हणून माजी नगरसेवक सागर भैय्या गवळी यांचे नाव आदराने घेतले जाते. राजकीय आणि सामाजिक कार्याचा वारसा लाभलेल्या सागर गवळी यांनी २०१७ मध्ये आमदार महेश दादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग ५ मधून निवडणूक लढवली आणि मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून नगरसेवक म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. गेल्या काही वर्षांत त्यांनी केवळ आपल्या प्रभागाचा चेहरामोहरा बदलला नाही, तर जनसेवेचा एक नवा आदर्शही घालून दिला आहे.**










सागर गवळी यांनी नगरसेवक पदाच्या कार्यकाळात भोसरी, दिघी आणि आळंदी रोड परिसरातील वर्षानुवर्षांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावले. वाढत्या नागरीकरणाचा विचार करून त्यांनी रस्त्यांचे डांबरीकरण आणि काँक्रिटीकरणावर भर दिला. विशेषतः भोसरी-दिघी रस्ता आणि आळंदी रस्त्यावरील कामांमुळे वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मोठी मदत झाली. गंगोत्री चौक ते हरी ओम चौकापर्यंतचा वाहतुकीचा प्रश्न त्यांनी कौशल्याने हाताळला. वाढत्या लोकसंख्येची पाण्याची गरज ओळखून २० लाख लिटर क्षमतेच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणे आणि वाढत्या वाहनांसाठी चार मजली वाहनतळाची उभारणी करणे, हे त्यांच्या दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण आहे. तसेच शास्त्री चौक महावितरण हायटेंशन केबल अंडपग्राऊंड चे काम मार्गी लावले.

कोरोना महामारीच्या काळात जेव्हा संपूर्ण जग ठप्प झाले होते, तेव्हा सागर गवळी यांनी स्वतःच्या जिवाची पर्वा न करता प्रत्यक्ष जमिनीवर उतरून काम केले. नागरिकांच्या घरी जाऊन औषधे, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक सेवा पोहोचवण्याचे काम त्यांनी अविरतपणे केले. संकटाच्या वेळी नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्यामुळे त्यांच्याबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला.

केवळ भौतिक विकासच नव्हे, तर सामाजिक आणि धार्मिक कार्यातही ते नेहमीच अग्रेसर असतात. पालखी सोहळ्याच्या निमित्ताने वारकऱ्यांना अन्नदान करणे, ही त्यांची श्रद्धा आणि संस्कृतीप्रती असलेली निष्ठा दर्शवते. वर्षातून दोनदा भव्य आरोग्य शिबिरे आयोजित करून गोरगरीब रुग्णांना मदतीचा हात दिला जातो. महिला सक्षमीकरण आणि ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांसाठी त्यांनी राबवलेले विविध उपक्रम हे त्यांच्या सर्वसमावेशक कार्याची पावती आहेत.

आमदार महेश दादा लांडगे यांचे अत्यंत विश्वासू आणि निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून सागर गवळी ओळखले जातात. दांडगा जनसंपर्क आणि प्रभागातील प्रत्येक गल्लीबोळातील प्रश्नांचा सखोल अभ्यास ही त्यांची मोठी जमेची बाजू आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार येणारी नवनवीन आव्हाने पेलण्यासाठी ते सक्षम आहेत, हे त्यांनी आपल्या कामातून सिद्ध केले आहे.

अनुभवी लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ख्याती पाहता, येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत त्यांना पुन्हा संधी मिळेल आणि नागरिक त्यांच्यावर विश्वासाने शिक्कामोर्तब करतील, असा दाट विश्वास मतदारसंघातील जनतेमध्ये दिसून येत आहे. जनसेवेचा हा यज्ञ असाच सुरू ठेवत, प्रभाग ५ ला आदर्श प्रभाग बनवण्यासाठी सागर भैया गवळी आजही तितक्याच उत्साहाने कार्यरत आहे.








